कोलकाताने रोखला गुजरातचा विजयरथ!

कोलकाता, वृत्तसंस्था. कोलकातासाठी हा विजय आणखी खास ठरला, कारण ईडन गार्डन्सवरील हा त्यांचा १०० वा सामना होता. गुजरातसाठी शुभमन गिल-जॉस बटलरने शतकी भागीदारी केली, पण त्यांना संघाला विजयापर्यंत पोहचवता आले नाही. या सामन्यात कोलकाताने २४८ धावांचे लक्ष्य गुजरातसमोर ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना गुजरातला २० षटकात ४ बाद २१८ धावाच करता आल्या. कोलकाताचा हा १२ सामन्यांतील ५ विजय आहे. तसेच गुजरातचा मात्र १३ सामन्यांतील ५ वा पराभव होता. गुजरातने या सामन्यापूर्वी गेल्या ५ सामन्यांत सलग विजय मिळवले होते. पण अखेर त्यांचा हा विजयरथ कोलकाताने रोखला.गुजरातकडून शुभमन गिल आणि साई सुदर्शन यांनी डावाची सुरुवात केली. सुरुवातीलाच सुदर्शनने पहिल्या षटकात दोन चौकारांसह सुरुवात केली. दुसऱ्या आणि तिसऱ्या षटकात मिठुन या दोघांनी २७ धावा वसूल केल्या. पण तिसऱ्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर सुदर्शनच्या डाव्या हाताच्या कोपऱ्याला लागला.

त्यामुळे रियायर्ड हर्ट होऊन सुदर्शनला बाहेर जावे लागले होते. त्यानंतर फलंदाजीला आलेला निशांत सिंधू पण त्याला पाचव्या षटकात सुनील नरेनने १ धावेवरच बाद केले. पण नंतर फलंदाजीला आलेल्या जॉस बटलरने कर्णधार शुभमनची भक्कम साथ दिली. या दोघांनी आक्रमक खेळताना तब्बल १२८ धावांची भागीदारी केली. दोघांनी अर्धशतकं केली.

गिल शतक करेल, असेही चित्र होते. परंतु, १७ व्या षटकात सुनील नरेनच्या गोलंदाजीवर अनुकूल रॉयने बाऊंड्री लाईनजवळ त्याला अफलातून झेल घेतला. त्यामुळे गिल ४९ चेंडूत ५ चौकार आणि ७ षटकारांसह ८५ धावा करून बाद झाला. त्यामुळे सुदर्शन पुन्हा मैदानात आला. तो आणि बटलर आक्रमक खेळत होते. पण सौरभ दुबेने बटलरला १९ व्या षटकात बाद केले आणि गुजरातची आशा संपवली.

केकेआरने जिवंत ठेवले प्लेऑफचे आव्हान

कोलकाताने गुजरातवर विजय मिळवत प्लेऑफचे आव्हान कायम राखले. गुजरात जिंकली असती तर त्यांचे प्लेऑफ स्थान निश्चित झाले असते. गुजरातचे १६ गुण असून संघ दुसऱ्या क्रमांकावर कायम आहे, तर कोलकाताचे ११ गुणांसह सातवे स्थान आहे. गुजरातचा साखळी फेरीतील एक सामना, तर कोलकाताचे दोन सामने बाकी आहेत. प्लेऑफच्या शर्यतीत टिकण्यासाठी दोन्ही संघांना उर्वरित सामने जिंकणे आवश्यक आहे. बंगळुरू १६ गुणांसह अव्वल स्थानावर आहे.

शुभमन गिलचे शतक हुकले

धावफलक

कोलकाता नाईट राइडर्स

रहाणे	गो सिराज	१४
एलन	झे राशिद गो किशोर	९३
रघुवंशी	नाबाद	८२
ग्रीन	नाबाद	५२

अतिरिक्त : ०६ एकूण : २० षटकात २४७/२

गोलंदाजी	ओ.	मे.	धावा	विकेट
सिराज	४	०	५०	१
रबाडा	४	०	४०	०
होल्डर	४	०	३९	०
राशिद	४	०	५७	०
साई	३	०	३८	१
अरशद	१	०	२२	०

गुजरात टाइटन्स

सुदर्शन	नाबाद	५३
शुभमन	झे रॉय गो नारायण	८५
निशांत	झे पांडे गो नरेन	०१
बटलर	गो दुबे	५७
राहुल	झे रघुवंशी गो ग्रीन	०२

अतिरिक्त २० एकूण २० षटकात २१८/४

गोलंदाजी	ओ.	मे.	धावा	विकेट
सौरभ	२.४	०	२३	१
ग्रीन	३	०	२५	१
त्यागी	४	०	५९	०
पाथिराना	१.२	०	९	०
नरेन	४	०	२९	२
चक्रवर्ती	४	०	४७	०
अनुकूल	१	०	१७	०

सूर्यवंशी, स्टार्कच्या कामगिरीकडे असेल विशेष लक्ष

दिल्ली, आरआरसाठी 'करो वा मरो' सामना

दिल्ली, वृत्तसंस्था. प्लेऑफच्या आशा जिवंत ठेवण्यासाठी राजस्थान रॉयल्स आणि दिल्ली कॅपिटल्सला रविवारी होणारा आयपीएलचा महत्त्वाचा सामना जिंकणे आवश्यक आहे, आणि वेगवान व स्विंग गोलंदाजीचा बादशाह मिचेल स्टार्कचा सामना वैभव सूर्यवंशी कसा करतो याकडे सर्वांचे लक्ष लागलेले असेल. दिल्लीने १२ सामन्यांतून १० गुण मिळवले आहेत आणि त्यांच्या प्लेऑफमध्ये पोहोचण्याची शक्यता कमी आहे. या सामन्यातील पराभव त्यांना शर्यतीतून बाहेर काढेल. दुसरीकडे, रॉयल्सने ११ सामन्यांतून १२ गुण मिळवले आहेत आणि एका आठवड्याच्या विश्रांतीनंतर ते ताजेतवाने होऊन मैदानावर परततील. दिल्ली आपली विजयी घोडदौड खराब करणार नाही, यासाठी ते सर्वतोपरी प्रयत्न करतील.

सचिन तेंडुलकरनंतर, बिहारच्या समस्तीपूरचा सूर्यवंशी इतका लोकप्रिय झालेला दुसरा कोणताही तरुण खेळाडू नाही. तो फिरोजशाह कोटला स्टेडियमवर पहिल्यांदाच खेळणार आहे आणि त्याला फलंदाजी करताना पाहण्याची इतकी क्रेझ आहे की, मोफत पास मिळवण्यासाठी झुंबड उडाली आहे.

आयपीएलच्या १९ वर्षांच्या इतिहासात दिल्ली कॅपिटल्सचे चाहते एकनिष्ठ राहिलेले नाहीत. जेव्हा रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू कोटला स्टेडियमवर खेळतात, तेव्हा प्रेक्षक 'कोहली कोहली!' असा जयघोष करतात, तर जेव्हा चेन्नई सुपर किंग्स खेळतात, तेव्हा संपूर्ण कोटला स्टेडियम पिवळ्या रंगाच्या रोषणाईने उजळून निघते आणि धोनीचा सात नंबरचा जर्सी सर्वत्र दिसतो. गेल्या अनेक वर्षांपासून चाहतावर्ग निर्माण करू न शकलेला दिल्ली संघ रविवारी मैदानात उतरेल, त्यामुळे प्रेक्षकांनी सूर्यवंशीसाठी जल्लोष केल्यास आश्चर्य वाटणार नाही.

११ सामन्यांमध्ये ठोकले ४० षटकार

गेल्या ११ सामन्यांमध्ये ४० षटकार मारणारा आणि २३६.५५ च्या स्ट्राइक रेटने ४४० धावा करणारा सूर्यवंशी जबरदस्त फॉर्मात आहे आणि स्टार्क त्याला कसा रोखतो हे पाहणे बाकी आहे. आयपीएलमधील स्टार्कची कामगिरी संमिश्र राहिली आहे. आयपीएल २०२४ च्या अंतिम सामन्यात, त्याने आपल्या शानदार सुरुवातीच्या गोलंदाजीने केकेआरच्या विजयाचा पाया रचला. जर स्टार्कने कसोटी क्रिकेटमधील आपला फॉर्म परत मिळवला, तर सूर्यवंशीला आव्हानांना सामोरे जावे लागू शकते. आतापर्यंत ४०० हून अधिक कसोटी बळी घेतलेल्या स्टार्कला जर सुरुवातीलाच स्विंग आणि सीम मिळाली, तर सूर्यवंशीच्या तंत्राची खरी कसोटी लागेल.

वेटलिफ्टिंग चॅम्पियनशिप: भारताची पदकसंख्या चार

संजनाला मिळाले कांस्यपदक

गांधीनगर, वृत्तसंस्था. शनिवारी झालेल्या आशियाई वेटलिफ्टिंग चॅम्पियनशिपमध्ये संजनाने महिलांच्या ७७ किलो वजनी गटात कांस्यपदक जिंकून भारताच्या पदकतालिकेत चार पदकांची भर घातली. चार खेळाडूंच्या या स्पर्धेत संजनाने एकूण २२० किलो (स्नॅचमध्ये ९६ किलो आणि क्लीन अँड जर्कमध्ये १२४ किलो) वजन उचलून तिसरे स्थान पटकावले. चीनच्या गुइफांग लियाओने सुवर्णपदक जिंकले, तर उत्तर कोरियाच्या क्यॉन्ग यॉन्ग किमने रौप्यपदक पटकावले.पोडियमवर स्थान मिळवल्यामुळे, संजनाने सध्या सुरू असलेल्या खंडीय चॅम्पियनशिपमध्ये भारतासाठी कांस्यपदके जिंकणाऱ्या कोमल कोहर (४८ किलो), ज्ञानेश्वरी यादव (५३ किलो) आणि अजित नारायण (७१ किलो) यांच्या पंक्तीत स्थान मिळवले. महिलांच्या ८६ किलो गटात भारताची द्वितीय क्रमांक पटकावणारी वंशिता वर्मा चौथ्या स्थानावर राहिली. चीनच्या कुइटिंग पेंगने सुवर्णपदक जिंकले.बहरीनच्या अलिना मारुशचकने रौप्यपदक जिंकले, तर दक्षिण कोरियाच्या ह्योनजू जांगने कांस्यपदक पटकावले.

कॅस्पर रुड अंतिम फेरीत

रोम, वृत्तसंस्था. कॅस्पर रुडने जवळपास दोन तास पावसामुळे खेळ थांबला असतानाही आपला संयम राखला आणि इटलीच्या लुसियानो डार्डेरीचा ६-१, ६-१ असा पराभव करून पहिल्यांदाच इटालियन ओपन टेनिस स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. पाऊसामुळे खेळ थांबवण्यात आला तेव्हा रुड पहिल्या सेटमध्ये ४-१ ने आघाडीवर होता.

रविवारी होणाऱ्या अंतिम सामन्यात त्याचा सामना जागतिक क्रमवारीत अव्वल असलेल्या यानिक सिन्नर किंवा डॅनियल मेद्वेदेव यांच्यापैकी एकाशी होईल. सिन्नर आणि मेद्वेदेव यांच्यातील उपांत्य फेरीचा सामना पावसामुळे रद्द करण्यात आला. जेव्हा सामना पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला, तेव्हा इटालियन खेळाडू सिन्नर रशियाच्या मेद्वेदेववर ६-२, ५-७, ४-२ ने आघाडीवर होता. महिलांचा अंतिम सामना कोको गॉफ आणि एलिना स्वितोलिना यांच्यात खेळला जाईल. फ्रेंच ओपनपूर्वीची ही शेवटची सराव स्पर्धा आहे.

आयपीएल २०२६ गुणतक्ता

क्र.	संघ	सामने	विजय	पराभव	रद्द	गुण	धावगती
१	बंगळुरू	१२	०८	०४	००	१६	१.०५३
२	गुजरात	१३	०८	०५	००	१६	०.४००
३	हैदराबाद	१२	०७	०५	००	१४	०.३३१
४	पंजाब	१२	०६	०५	०१	१३	०.३५५
५	राजस्थान	११	०६	०५	००	१२	०.०८२
६	चेन्नई	१२	०६	०६	००	१२	०.०२७
७	केकेआर	१२	०५	०६	०१	११	-०.०३८
८	दिल्ली	१२	०५	०७	००	१०	-०.९९३
९	मुंबई	१२	०४	०८	००	०८	-०.५०४
१०	लखनौ	१२	०४	०८	००	०८	-०.७०१

नक्वी आयसीसी बैठकीला व्हर्च्युअली उपस्थित राहणार

दिल्ली, वृत्तसंस्था. पाकिस्तान क्रिकेट बोर्डचे अध्यक्ष मोहसिन नक्वी यांना अहमदाबाद येथे होणाऱ्या आयपीएलच्या अंतिम सामन्यासाठी आमंत्रित करण्यात आलेले नाही आणि ते आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या (आयसीसी) वार्षिक बोर्ड बैठकीला व्हर्च्युअली उपस्थित राहणार आहेत.

असे समजते की, नक्वी आयसीसीच्या संचालक मंडळाच्या बैठकीला व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे उपस्थित राहणार आहेत. प्रवासास असमर्थ असलेल्या सदस्य प्रतिनिधींसाठी ही सुविधा नेहमीच उपलब्ध असते.

आरसीबी पंजाबपुढे अधिक मजबूत

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा प्लेऑफवर डोळा

धर्मशाळा, वृत्तसंस्था. गतविजेता रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) संघ रविवारी होणाऱ्या इंडियन प्रीमियर लीग सामन्यात पंजाब किंग्सच्या कमकुवत गोलंदाजीचा फायदा घेऊन प्लेऑफमधील आपले स्थान निश्चित करण्याचा प्रयत्न करेल.

नयनरम्य धर्मशाला स्टेडियमवर होणाऱ्या या सामन्याचे मुख्य आकर्षण निःसंशयपणे विराट कोहली असेल, ज्याने मागील सामन्यात शतक झळकावले होते. धौलाधार पर्वतरांगेच्या चित्तथरारक पार्श्वभूमीवर कोहलीला फलंदाजी करताना पाहण्यासाठी दिल्ली आणि पंजाबमधील मोठ्या संख्येने चाहते आधीच हिमाचलच्या पर्वतरांगांमध्ये दाखल झाले आहेत. आरसीबी हा स्पर्धेतील एकमेव संघ आहे ज्याने आपले सातत्य कायम राखले आहे आणि पंजाबविरुद्ध विजयासाठी एक प्रबळ दावेदार म्हणून स्पर्धेत उतरेल. स्पर्धेची शानदार सुरुवात करणाऱ्या पंजाब किंग्सवर सलग पाच सामने गमावल्यानंतर स्पर्धेतून लवकर बाहेर पडण्याचा धोका आहे. जरी आरसीबी गुणतालिकेत मजबूत स्थितीत असली तरी, पंजाब किंग्सचा आणखी एक पराभव झाल्यास प्लेऑफचे दरवाजे जवळजवळ बंद होतील. येथे खेळल्या गेलेल्या शेवटच्या दोन सामन्यांमध्ये पंजाब किंग्सला शेवटच्या पाच षटकांमध्ये आपल्या गोलंदाजीवर नियंत्रण ठेवता आले नाही.

फातिमाकडे पाकचे नेतृत्व

लाहोर, वृत्तसंस्था. पाकिस्तानने पुढील महिन्यात इंग्लंड आणि वेल्समध्ये होणाऱ्या महिला टी-२० विश्वचषकासाठी फातिमा सनाच्या नेतृत्वाखालील १५ सदस्यीय संघाची घोषणा केली आहे. या संघात अशा पाच खेळाडूंचा समावेश आहे, ज्या या जागतिक स्पर्धेत पहिल्यांदाच सहभागी होत आहेत. निवड समितीने शनिवारी १५ सदस्यीय संघाची घोषणा केली. विश्वचषकापूर्वी हा संघ आयर्लंडमध्ये होणाऱ्या त्रिकोणीय टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेतही सहभागी होणार असून, वेस्ट इंडिज हा तिसरा संघ असेल. आयमान फातिमा, नतालिया परवेझ, रमीन शमीम, सायरा जबीन आणि तस्मिया रुबाब या महिला टी-२० विश्वचषकात पदार्पण करणाऱ्या खेळाडूंमध्ये आहेत.

Short News

पंतला १२ लाखांचा दंड

लखनौ. चेन्नई सुपर किंग्सविरुद्धच्या आयपीएल सामन्यादरम्यान षटकांचा वेग कमी ठेवल्याबद्दल लखनौ सुपर जायंट्सचा कर्णधार ऋषभ पंतला १२ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. शुक्रवारी झालेल्या सामन्यात लखनौने चेन्नईला सात गडी राखून पराभूत केले, ज्यामुळे त्यांच्या प्लेऑफच्या आशांना मोठा धक्का बसला आहे. किमान षटकांच्या वेगाशी संबंधित आयपीएल आचारसंहितेच्या कलम २.२२ अंतर्गत हा त्याच्या संघाचा पहिलाच गुन्हा होता, त्यामुळे ऋषभ पंतला १२ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे.

एमसीएला मिळाले युगांडाचे यजमानपद

मुंबई. मुंबई क्रिकेट असोसिएशन (एमसीए) पुढील आठवड्यापासून युगांडाच्या क्रिकेट संघाचे यजमानपद भूषवणार असून, हे सामने १८ ते ३० मे दरम्यान चार एकदिवसीय आणि चार टी-२० सामने खेळवले जातील. एमसीएने शनिवारी जाहीर केले की, चार एकदिवसीय सामने एमसीए कोल्ट्स संघाविरुद्ध खेळले जातील, तर युगांडाचा संघ टी-२० मुंबई लीगमधील फ्रँचायझींविरुद्ध टी-२० सामने खेळेल. पुरुष टी-२० मुंबई लीगचा चौथा हंगाम १ ते १३ जून दरम्यान आयोजित केला जाईल. या मालिकेतील पहिले दोन एकदिवसीय सामने १८ आणि २० मे रोजी पालघर-डहाणू तालुका क्रीडा संघटनेच्या मैदानावर खेळले जातील.

थायलंड ओपन : तीन गेमच्या रोमांचक सामन्यात मलेशियन जोडीला हरविले

सात्विक-चिराग जोडी अंतिम फेरीत दाखल

बँकॉक, वृत्तसंस्था. सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीने थायलंड ओपन सुपर ५०० बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष दुहेरीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. त्यांनी तीन गेमच्या रोमांचक सामन्यात मलेशियाच्या गोह जी फेई आणि नूर इझुद्दीन यांचा पराभव केला.

जागतिक क्रमवारीत चौथ्या क्रमांकावर असलेल्या सात्विक आणि चिराग यांनी नवव्या क्रमांकावरील मलेशियन जोडीचा ८२ मिनिटांत १९-२१, २२-२०, २१-१६ असा पराभव केला. सामन्यानंतर चिराग म्हणाला, खूप छान वाटत आहे. आमची वर्षाची सुरुवात फारशी चांगली झाली नाही आणि त्या खराब सुरुवातीमुळे आम्ही मानसिकदृष्ट्या खंबीर नव्हतो. खेळाडू म्हणून आम्हाला उत्तरांची खूप गरज होती. अखेरीस, थॉमस कपमधील कांस्य पदकाने आमचा आत्मविश्वास लक्षणीयरीत्या वाढवला. आणि आता आम्ही या वर्षातील आमची पहिली अंतिम फेरी येथे खेळत आहोत.

आशा आहे की, आम्ही हे विजेतेपद जिंकू. भारतीय जोडीने २०१९ आणि २०२४ मध्ये विजेतेपद पटकावले असून, ते तिसऱ्यांदा अंतिम फेरीत पोहोचले आहेत. आता त्यांचा सामना इंडोनेशियाचे लिओ रॉली कार्नांडो आणि डॅनियल मार्टिन किंवा चीनचे हे जी टिंग आणि रेन शियांग यू यांच्यापैकी एकाशी होईल.

२०१९ मध्ये मिळविले जेतेपद **२०२४** मध्येही ही जोडी अजिंक्य ठरली

चांगल्या सुरुवातनंतर मलेशिया पराभूत

- मलेशियन जोडीने चांगली सुरुवात केली आणि ३-१ अशी आघाडी घेतली, परंतु सात्विक आणि चिराग यांनी ५-५ अशी बरोबरी साधली.
- पहिल्या गेममध्ये, ब्रेकपर्यंत मलेशियन जोडीने ११-८ अशी आघाडी घेतली होती. चिरागच्या चुकीमुळे शटल नेटमध्ये गेले, ज्यामुळे पिछाडी वाढली.
- मलेशियन जोडीने पहिला गेम २१-१९ ने जिंकला. त्यानंतर दुसरा गेम अटीतटीचा झाला, ज्यात स्कोअर ३-३ ते ६-६ असा होता.
- भारतीय जोडीने ९-६ अशी आघाडी घेतली, पण चिरागच्या रिटर्नमुळे शटल नेटमध्ये गेल्याने आघाडी १०-९ अशी कमी झाली. ब्रेकनंतर स्कोअर पुन्हा १३-१३ असा झाला.
- चिरागने भारताला १६-१४ अशी आघाडी मिळवून दिली, पण एका रिटर्नमुळे शटल नेटमध्ये गेल्याने स्कोअर पुन्हा १६-१६ असा झाला.

टीकाकारांना आपल्या कामगिरीतून दिले उत्तर

डेन्मार्कमधील थॉमस कपमध्ये कांस्यपदक जिंकूनही भारतात बॅडमिंटनला योग्य ते लक्ष आणि प्रशंसा मिळत नाही, या वक्तव्यामुळे सात्विक आणि चिराग अलीकडेच चर्चेत होते. मात्र, त्यांनी बाहेरील टीका-टिप्पणीकडे दुर्लक्ष केले आणि अंतिम फेरीत पोहोचण्यासाठी उत्कृष्ट कामगिरी केली. मलेशियन जोडीविरुद्ध त्यांचा ७-२ असा रेकॉर्ड होता, परंतु गेल्या वर्षी इंडिया ओपन सुपर ७५० स्पर्धेत गोह आणि इझुद्दीन यांनी त्यांना पराभूत केले होते.

मोदींनी केले डच कोचचे कौतुक

हेग, वृत्तसंस्था. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नेदरलँड दौऱ्यादरम्यान आपल्या भाषणात, भारतीय हॉकीमधील डच प्रशिक्षकांच्या योगदानाचा उल्लेख केला आणि विशेषतः महिला हॉकी संघाचे सध्याचे प्रशिक्षक, स्योर्ड मारिन यांची प्रशंसा केली. पंतप्रधान मोदी एका भारतीय समुदायाच्या कार्यक्रमात म्हणाले, नेदरलँड आणि भारत यांच्या मैत्रीचा आणखी एक दुवा आहे ज्यावर फारशी चर्चा होत नाहीः तो म्हणजे क्रीडा. आपले दोन्ही देश क्रीडा क्षेत्रात एकत्र मिळून बरेच काही करत आहेत. ज्याप्रमाणे भारतीयांनी क्रिकेटमध्ये योगदान दिले आहे, त्याचप्रमाणे नेदरलँडनेही भारतीय हॉकीमध्ये मोठे योगदान दिले आहे. डच प्रशिक्षकांनीही भारतीय हॉकीच्या पुढील सुधारणेसाठी योगदान दिले आहे. आमचा महिला हॉकी संघ गेल्या काही काळापासून उत्कृष्ट कामगिरी करत आहे आणि यात प्रशिक्षक स्योर्ड मारिन यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

बैंक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda
शाखा -धरमपेठ, नागपूर
पोस्ट बॉक्स नं. 210, डब्लु.एच.सी. रोड, धरमपेठ, नागपूर-10

शुध्दीपत्रक सुचना

सर्व संबंधित आणि मोठ्या प्रमाणात सार्वजनिक लोकांना **08/05/2026 रोजी प्रकाशित** झालेल्या वृत्तपत्रातील ई-लिलाव विक्री नोटीसमध्ये पुढील सुधारणांची नोंद घ्यावी. हे स्पष्ट केले आहे की **संपत्ती कर्जदार मेसर्स के के इंडस्ट्रीज**, यांची ई-लिलावाची तारीख : **25/05/2026 आणि** मालमत्ता तपासणी तारीख : **11/05/2026 ते 22/05/2026 हि चुकीच्या पद्धतीने प्रकाशित** झाले असुन **त्या ऐवजी** कृपया **सुधारीत संपत्ती ची** ई-लिलावाची तारीख : **10/06/2026 आणि** मालमत्ता तपासणी तारीख : **01/06/2026 ते 09/06/2026 अशी** वाचण्यात यावी. इतर नियम आणि अटी विक्री सूचनाप्रमाणे राहील.

स्थळ : नागपूर
दिनांक : 17/05/2026
अधिकृत अधिकारी
बँक ऑफ बडोदा
(इंग्रजीतील मूळ मजकूर ग्राह्य धरण्यात येईल)

पाकविरुद्धची कसोटी, लिटनचे शतक

बांगलादेशच्या २७८ धावा

सिल्हेट, वृत्तसंस्था. यष्टीरक्षक-फलंदाज लिटन दासच्या (१२६) शतकाच्या जोरावर बांगलादेशने सुरुवातीच्या धक्क्यातून सावरत शनिवारी पाकिस्तानविरुद्धच्या दुसऱ्या आणि अंतिम क्रिकेट कसोटीच्या पहिल्या दिवशी आपल्या पहिल्या डावात २७८ धावांची आरामदायक धावसंख्या उभारली. लिटनने आपल्या १५९ चेंडूंच्या खेळीत १६ चौकार आणि दोन षटकार ठोकले. दिवसाचा खेळ संपला तेव्हा, पाकिस्तानने एकही गडी न गमावता २१ धावा केल्या होत्या आणि ते २५७ धावांनी पिछाडीवर होते. लिटन वगळता बांगलादेशचा इतर कोणताही फलंदाज ३० धावांपर्यंत पोहोचू शकला नाही, ज्यामुळे पाकिस्तानच्या शिस्तबद्ध वेगवान गोलंदाजीसमोर त्यांची फलंदाजीतील कमजोरी उघड झाली. पाकिस्तान संघात शाहीन शाह आफ्रिदीच्या जागी आलेल्या खुर्रम शहजादने ८१ धावांत चार बळी घेतले, तर मोहम्मद अब्बासने ४५ धावांत तीन बळी घेतले. हसन अली त्याच्या पहिल्याच षटकात विचित्ररित्या पडल्यानंतर त्याला स्ट्रेचरवरून मैदानाबाहेर नेण्यात आले. नंतर तो परतला आणि लिटनच्या विकेटसह ४९ धावांत दोन बळी घेतले. पाकस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि अब्बासने डावाच्या दुसऱ्याच चेंडूवर महमुदुल हसनला शून्य धावांवर बाद केले. तन्झिद हसनने आपल्या कसोटी पदार्पणात २६ धावा केल्या.

बैंक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda
शाखा : सिव्हील लाईन्स, नागपूर
तळमजला, बी.एस.एन.एल सी टी ओ बिल्डींग, नागपूर - 440001

स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना
"परिशिष्ट-IV-A [नियम 6 (2) आणि 8 (6) ची तरतूद पहा]

सिक्यूरिटी इंटरेस्ट (ईन्फोर्समेंट) रुल्स 2002 च्या नियम 6 (2) आणि 8 (6) च्या तरतुदीसह सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकंस्ट्रक्शन ऑफ फाइनैंशियल ॲसेटस ॲन्ड ईन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ऍक्ट 2002 च्या अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना .

याद्वारे सामान्यत: जनतेला आणि विशेषत: कर्जदार, गहाणदार आणि जामीनदारांना नोटीस दिली जाते की खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता सुरक्षित कर्जदाराकडे गहाण/आकारणी केली आहे, ज्याचा ताबा कर्जदाराने घेतला आहे. बँक ऑफ बडोदाचे अधिकृत अधिकारी, सुरक्षित कर्जदार, खाली नमूद केलेल्या खात्यांतील थकबाकी वसूल करण्यासाठी **"जसे आहे तेथे", "जसे आहे तसे", आणि "जे काही आहे"** या आधारावर विकले जातील. कर्जदार/s/गहाणदार/जमीनदार/s/सुरक्षित मालमत्ता/s/देय/राखीव किंमत/ई-लिलावाची तारीख आणि वेळ, ईएमडी आणि बोली वाढीची रक्कम यांचे तपशील खाली नमूद केले आहेत.

अनु./ लॉट क्र.	कर्जदार/जमानतदार/ गहाणदार यांचे नाव आणि पत्ता	स्थावर मालमत्तेचे वर्णन (गहाणदार)	एकूण देय.	1. राखीव किंमत / 2. अर्नेस्ट मनी डिपॉझिट (ईएमडी) / 3. बिड वाढीव रक्कम	ई-लिलावाची तारीख ई लिलावाची वेळ - प्रारंभ वेळ ते समाप्ती वेळ	ताब्यात घेण्याची स्थिती (सांकेतिक/ वास्तविक)	मालमत्ता तपासणी तारीख आणि वेळ.	संपर्क व्यक्तीचे नाव व संपर्क क्रमांक
1	**श्री.सिद्धार्थ रामभाऊ रामटेके** **पत्ता :** फ्लॅट नं. 402, 4था मजला, जॅरी प्रॉफिट आम्रपाली फेज II, सुगत नगर, नारी बस स्टॅंड रोड, सनसिटी अपार्टमेंट जवळ, उप्पलवाडी नागपूर-440026.	संपूर्ण आरसीसी सुपरस्ट्रक्चर समावेश असलेले **अपार्टमेंट नं. 402**, ज्याचे समावेश कारपेट क्षेत्रफळ एरीया 48.113 चौ.मी., सुपर बिल्टअप एरीया 96.257 चौ.मी. (म्हणजे 1036.110 चौ.फुट) स्थित चौथा मजला बिल्डींग आम्रपाली फेज-II नावानी परिचीत च्यासह 6.514% अविभाजीत हिस्सा आणि व्याजासह त्यावरील बांधकामासह असलेले सर्व भाग आणि तुकडा असलेले जमिन (1500.00 चौ.मी.) असलेले प्लॉट नं. आर-2, एकुण क्षेत्रफळ एरीया 627.00 चौ.मी. (6749.00 चौ.फुट) असलेले संपूर्ण जमिनीचा एक भाग असलेले खसरा नं. 53, मौजा नारी, सिटी सर्व्हे नं. 415, शिट नं. 920/55, महानगरपालिका घर नं. 2165/आर-2, वार्ड नं. 57 स्थित सुगत नगर, नागपूर, नागपूर सुधार प्रन्यास आणि नागपूर महानगरपालिकेच्या हद्दित असलेले तहसिल आणि जिल्हा नागपूर. **दिनांक 05/06/2023 च्या विक्री करारानुसार बिल्डींगची चर्तुसिमा : पूर्वेस :** प्लॉट नं. 44, **पश्चिमेस :** अंतर्गत विद्यमान रोड, **उत्तरेस :** रोड, **दक्षिणेस :** रोड. **फ्लॅट नं. 402 च्या मूल्यांकन अहवालानुसार चर्तुसिमा : पूर्वेस :** बिल्डींगची मोकळी जागा (मार्जिन), **पश्चिमेस :** कॉमन पॅसेज आणि फ्लॅट नं. 403, **उत्तरेस :** फ्लॅट नं. 401, **दक्षिणेस :** बिल्डींगची मोकळी जागा (मार्जिन) **गहाणदार : श्री. सिद्धार्थ रामभाऊ रामटेके**	रु. 35,23,062.63 + लागु न झालेले व्याज + दंडणिय व्याज आणि अन्य खर्च	रु. 38,25,774/- / रु. 3,82,577/- / रु. 25,000/-	20/06/2026 रोजी 14:00:00 ते 18:00:00 वा. पर्यंत	सांकेतिक	16/06/2026 रोजी 10:00:00 ते 17:00:00 वा. पर्यंत	श्री. दिपक कुमार सिन्हा 8417881549

विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तींसाठी, कृपया https://www.bankofbaroda.in/e-auction.htm आणि ऑनलाईन ऑक्शन पोर्टल https://baanknet.com या वेबसाइट लिंकला पहा/भेट द्या. तसेच, संभाव्य बोलीदार अधिकृत अधिकाऱ्याशी दूरध्वनी क्रमांक / मोबाईल क्रमांक 8417881549 वर संपर्क साधू शकतात.

येथे स्कॅन करा तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी.

दिनांक : 17/05/2026
स्थळ : नागपूर
अधिकृत अधिकारी
बँक ऑफ बडोदा
(इंग्रजीतील मूळ मजकूर ग्राह्य धरण्यात येईल)